Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 397 – 400
DOI: 10.5281/zenodo.10129768

**Original Research Article**

# महात्मा गांधी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

प्रा. डॉ. संतोष कुटे

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: dr.santoshkute@gmail.com

Received: 08 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. स्वतःदेखील याच तत्त्वांनुसार जगले आणि इतरांनीही तसे करावे असे सुचवले. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला. त्यांच्या शेवटच्या वर्षांमध्ये भारत - पाकिस्तान फाळणीमुळे व्यथित झालेल्या गांधींनी हिंदू-मुस्लिम दंगे थांबवण्यासाठी प्रयत्न केले. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते.२ ऑक्टोबर हा महात्मा गांधींचा जन्मदिवस हा भारतात गांधी जयंती म्हणून आणि जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो. गांधीजींनी ग्रामविकास ,कुटीर उद्योग, कृषी विकास यावर महत्त्वपूर्ण असा भर दिला.महात्मा गांधीजींचे विचार ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे दुय्यमस्त्रोतावर आधारित असून त्यामध्ये प्रकाशित अप्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, विविध संदर्भ ग्रंथ इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

## संशोधन विषयाची उद्दिष्टे

१. ग्रामीण अर्थव्यवस्थेविषयी महात्मा गांधीजींचे विचार अभ्यासणे
२. गांधीजींचे कृषी विषयक व उद्योग विषयक विचार अभ्यासणे
३. गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता अभ्यासणे

**महात्मा गांधी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था**

गांधीजींनी ग्रामीण भागाचा विकास व्हावा म्हणून शेतीला पूरक व्यवसाय म्हणून त्यांनी खादी उद्योगाला महत्त्व दिले असे उद्योग करीत असताना ग्रामीण क्षेत्राचा उद्धार हे उद्दिष्ट त्यांनी नजरेसमोर ठेवले. ग्रामीण भागातील लोकांना स्वावलंबी बनण्याची प्रेरणा त्यांनी दिली. आदर्श खेडी निर्माण करण्याचा संदेश दिला. खेड्यातील जनतेने नेहमी परस्पर सहकार्याची भावना निर्माण करावी गावातील शेती व उद्योग यांचा सहसंबंध जोडण्यात यावा गावी ही स्वायत्त व स्वावलंबी बनवावीत ग्रामीण भागात आर्थिक समानता निर्माण करून भारत बलशाली राष्ट्र बनेल असे महात्मा गांधीजींना वाटत होते.

समाजातील विविध घटकांच्या उत्पन्नावर कमाल मर्यादा घातली पाहिजे कारण त्यामुळे आर्थिक विषमतेस प्रतिबंध घालता येईल. उदरनिर्वाहासाठी शहराकडे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी महात्मा गांधींनी 1934 मध्ये ग्रामोद्योग संघ नावाची संस्था सुरू केली शहरी विभागात परदेशी कंपन्यांनी बाजारपेठा काबीज केल्या व त्यामुळे खेड्याच्या विनाशाला सुरुवात झाली त्यातूनच कर्जबाजारीपणा व्यसनाधीनता अशा संकटांचा सामना करावा लागतो. त्यामुळे खेड्यात रमलेला अन्नदाता हवालदिल झालेला दिसतो. माहिती तंत्रज्ञानाच्या ह्या काळात गांधीजींचा खेड्याकडे चला हा मूलमंत्र लक्षात घेऊन ग्रामीण पुनर्नमानाचे काम हाती घेणे आवश्यक झालेले आहे यातूनच ग्रामीण भागाचा विकास करता येईल.

खेडी नष्ट झाल्यास भारताचे अस्तित्व धोक्यात येईल त्यामुळे खेड्याचे पुनरुजीवन व पुनर्रचना करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण विकास योजनेअंतर्गत स्वच्छता अभियान आवश्यक आहे असे महात्मा गांधीजींचे मत होते. भारतातील खेड्यांची स्थिती याबाबतीत अत्यंत हलाखीची आहे. खेड्यात आजही घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. कितीतरी खेडी हागणदारीमुक्त होऊ शकली नाहीत. त्याकरिता तेथील लोकांसाठी स्वच्छता व आरोग्य यासाठीचे समुपदेशन आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत गांधीजींनी अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, खादी व ग्रामोद्योग इत्यादी कलमांचा अंतर्भाव केला होता. आजही समाजाची स्थिती फारशी समाधानकारक नाही. त्याकरिता आजही हया सर्व बाबीची अंमलबजावणी आवश्यक आहे. महात्मा गांधींनी ग्राम विकासाला सर्वात जास्त प्राधान्य दिले होते. ग्रामविकास करिता गांधीजींनी श्रमाला अधिक महत्त्व दिले होते.

श्रम विभागणी तत्त्वानुसार त्यांना बौद्धिक श्रम आणि शारीरिक श्रम ही विभागणी मान्य नाही. त्याकरिता त्यांनी ग्रामसेवकाला केंद्रभूत मानले. ग्रामसेवकांनी खादी निर्मितीच्या सर्व प्रक्रियेवर प्रभुत्व मिळवावे. त्यांनी गावात शिकवायला जावे. निशुल्क शिकवायला जावे. गावातील सर्व गोष्टी लक्ष घालून गावच्या स्वच्छतेला हातभार लावावा व गावातल्या हरीजनात मिसळून त्यांच्या सुख सोयीकडे विशेष लक्ष द्यावे असे गांधीजींना वाटत होते. गांधीजींच्या रामराज्यात सत्ता ही एका व्यक्तीकडे केंद्रित असेल तर खेडी स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर होणार नाहीत. त्यासाठी आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गांधीजींनी आवश्यक मानले.त्यांनी कुटीर उद्योगाचा जो पुरस्कार केला त्यामागे बेकारी निवारणाबरोबरच आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाची कल्पना आहे. जे उद्योग कारागिरांच्या झोपड्या मधून चालतात त्याचे तंत्र सहजसुलभ असते. त्यांना ठराविक वेळेत बंधन असत नाही म्हणून कारागिरांच्या कुटुंबीयांनाही त्यात सहभागी होता येते.हस्त व्यवसायातील कारागीर स्वतंत्र असतो त्याला कुणाचीही ताबेदारी पत्करावी लागत नाही.कामगार मात्र यंत्राचा एक भाग बनून जातो. त्याच्या सृजनशीलतेला व कार्यकौशल्याला वाव नसल्याने त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ खुंटते. कारखान्यातून कामगाराची पिळवणूक होते. उत्पन्नाच्या वाटणीतील विषमता वाढत जाते आणि फार थोड्या लोकांचे हातात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते म्हणून गांधीजींचे तत्व हे ग्राम विकास घडून आणणारे महत्त्वपूर्ण साधन आहे.

गांधीजींनी खेड्यातील लोकांच्या आर्थिक उद्धाराकरिता खादी निर्माण केली आणि त्याचा प्रसार केला. शेती हा खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय होता पण शेतीवर त्यांना बारमाही काम मिळत नव्हते आणि पुरेसा दामही मिळत नव्हता. शेतीला पूरक उद्योग म्हणून घरच्या घरी सुतकताई आणि खादी विनाई करता येण्यासारखी होती. खादी अथवा सुत कातने म्हणजे खरे स्वराज्य होय असे गांधीजींचे मत होते. खादीला त्यांनी केंद्रीभूत मानून गरिबाचा विकास साधने हा त्यांचा अत्यंत व्यापक दृष्टिकोन होता. महात्मा गांधीजींनी सर्वोदय समाजाच्या पुनर्निर्मानासाठी व खेडी स्वावलंबी बनवण्याकरिता शिक्षण पद्धतीत अमलाग्र बदल केला. शिक्षण हे चार भिंतीच्या आत दिले तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणार नाही. त्याकरिता गांधीजींनी चरखा केंद्रभूत मानून रचनात्मक कार्यक्रमाची उभारणी केली. उद्योग हे शिक्षणाचे माध्यम त्यांना बनवायचे होते. त्यांनी ग्रामोद्योगांना अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानले. ग्रामोद्योग श्रम प्रधान असल्याने कमी भांडवलात अधिक लोकांना रोजगार मिळेल. खेड्यातील लोकांना खेड्यातच काम मिळाल्याने खेडी ओस पडणे आणि शहरात झोपडपट्ट्यांची वाढ होणे ही समस्या सुटेल.

विदेशातील वस्तूंचा वापर करण्यापेक्षा आपल्या गरजा मर्यादित ठेवून स्वतःला आवश्यक असणाऱ्या वस्तू स्थानिक स्तरावर निर्माण कराव्यात असे ते म्हणत. गांधीजींनी अल्पविकसित व विकसित देशांसाठी स्वयंरोजगारांमधून ग्रामीण जनतेचा विकास पर्यायाने भारताचा आर्थिक विकास हे तत्व मांडले.जेवढी मागणी तेवढाच पुरवठा करा म्हणजे आर्थिक मंदीची स्थिती निर्माण होणार नाही. मोठ्या प्रमाणावर उत्पादन हे त्यांना मान्य नव्हते कारण त्यामुळे उत्पादक घटकांचा अपव्यय व कामगारांचे शोषण अशा समस्या निर्माण होतात. मालक आणि कामगार यांचे सलोख्यांचे संबंध असणे आवश्यक आहे. समाजात ज्याप्रमाणे सहकार्य प्रेम व परस्पर हिताच्या दृष्टिकोनातून व्यवहार चालतात त्याचप्रमाणे आर्थिक रचना ही तशीच असावी असे त्यांचे मत होते. आधुनिक काळात गांधीजींचे ग्रामीण विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्यामध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजना, हागणदारी गाव मुक्त योजना, सर्व शिक्षा अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना इत्यादी. परंतु तरीदेखील ग्रामीण विकासाचा संपूर्ण विकास होऊ शकला नाही. जागतिकीकरणामुळे ग्रामीण लोकांना शहरी संस्कृती आकर्षित करीत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे व त्यातून शहरीकरणाची समस्या उभी राहत आहे.

गांधीजींनी स्वदेशीचा आग्रह धरला स्वदेशी म्हणजे देशातील लोकांपर्यंत ग्राम उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू वापरण्यास उत्तेजन देणे होय. त्यामुळे देशी उद्योगांना प्रोत्साहन मिळून उत्पादन रोजगार उत्पन्न राहणीमान यात वाढ घडून येईल. उद्योगांना चालना मिळेल. देशाबाहेर जाणारी संपत्ती, भांडवलाचा देशातच वापर करणे शक्य होईल. त्यामुळे देश आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल. अर्थात परस्परांच्या गरजा भागविण्यासाठी व्यापार असावा हे तत्व त्यांना मान्य होते. कृषी ग्रामीण क्षेत्रातील उत्पादकता, गुंतवणूक, रोजगारनिर्मितीचे महत्त्व या संदेशातून गांधीजींनी अधोरेखित केले होते. त्यांच्या कल्पनेप्रमाणे जर प्रत्येक गाव स्वयंपूर्ण झाले तर भारताला फार मोठा आर्थिक विकास साधणे शक्य होईल. शहरी भागातील विकासाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण खेड्यांकडे गेले पाहिजे.

ग्रामीण भागाच्या परिवर्तनाचे व विकासाचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून माणूस निर्माण झाला तर समाजाचा दर्जा उंचावेल. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे केवळ बुद्धीचा विकास दाखवणाऱ्या पुस्तकी शिक्षण पद्धतीला गांधीजींचा विरोध होता. शिक्षणाने व्यक्तीला भावी जीवनात आधार मिळवून दिला पाहिजे. शिक्षण प्रक्रियेत श्रमास अधिक महत्त्व दिल्याने बुद्धी कृती व भावना यांचा समप्रमाणात विकास होतो. शिक्षणाने स्वावलंबन निर्माण होते. गांधीजींनी व्यावहारिक शिक्षणावर अधिक भर दिला.

गांधीजींनी नम्रता व श्रमप्रतिष्ठा यावर मुख्य भर दिला आहे. श्रमाने माणसात नम्रता येते. त्याला आत्मशक्तीचा साक्षात्कार होतो. त्याला आत्ममूल्य कळते. श्रम म्हणजे त्या आत्म्याची व शरीराची शुद्धी असते असे ते मानत. श्रम करणारा शेतकरी हा सर्वश्रेष्ठ मानला पाहिजे याशिवाय विणणे, सुतारकाम, लोहारकाम व इतर कष्टाची कामे करणाऱ्याला सुद्धा प्रतिष्ठा मिळावी. खेड्यात सहकार्याची भावना निर्माण करावी, गावातील शेती व उद्योग यांचा सहसंबंध जोडण्यात यावा. गावी ही स्वायत्त्व स्वावलंबी बनवावी. ग्रामीण भागात आर्थिक समानता निर्माण करून भारत बलशाली राष्ट्र बनेल असे महात्मा गांधींना वाटत होते.

**निष्कर्ष**

१. ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होण्यासाठी गांधीजींनी ग्राम उद्योगावर भर दिला.
२. गांधीजींचे विचार आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर देणारे आहेत.
३. गांधीजीं व्यक्तीला स्वयंपूर्ण बनविणाऱ्या उद्योगाभिमुख व्यावहारिक शिक्षणाचे पुरस्करते होते.
४. गांधीजींनी ग्रामीण भागाच्या विकासाकरिता आणि बेरोजगारी निर्मूलनाकरिता शेतीला पूरक ठरणाऱ्या उद्योगाचा पुरस्कार केला.
५. गांधीजींचे तत्त्वज्ञान आर्थिक समानता , स्त्री पुरुष समानता निर्माण करणारे आहे.
६. गांधीजींनी श्रम विभागणी तत्त्वाचा पुरस्कार केला होता.
७. ग्रामीण भागाच्या विकासाकरिता गांधीजींनी कृषी विकासाला प्राधान्य दिले होते.
८. गांधीजींच्या ग्रामविकासात आदर्श खेडी हा महत्त्वाचा भाग होता म्हणून त्यांनी खेड्याकडे चला हा संदेश दिला.
९. समाजाचे कल्याण व विकास हा गांधीजीच्या विचाराचा मूळ गाभा आहे.
१०. गांधीजींनी स्वयंरोजगारातून ग्रामीण जनतेचा विकास व पर्यायाने देशाचा विकास हे तत्त्व मांडले.

**संदर्भ सूची**


१. गांधी - नलिनी पंडित, ग्रंथाली प्रकाशन मुंबई
२. गांधीजी - पु.ल.देशपांडे, राजहंस प्रकाशन पुणे
३. गोष्टीरूप महात्मा गांधी - शामकांत कुलकर्णी, विजय प्रकाशन नागपूर
४. भारताचे भाग्यविधाते - डॉ.शांता कोठेकर, साईनाथ प्रकाशन नागपूर
५. भारतीय राजकीय विचारवंत - कृ.ती.बोराळकर, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर
६. गांधी एक सत्यवादी - डॉ. सहदेव शिंदे, रिया पब्लिकेशन कोल्हापूर
७. आर्थिक विचारांचा विकास - विजय कवीमंडळ, श्री मंगेश प्रकाशन नागपूर
८. भारताच्या आर्थिक समस्या - डॉ.मधुसूदन साठे, डायमंड पब्लिकेशन नागपुर